
## ❖ बॅस्टिलचा पाडाव –

- राष्ट्रीय सभेने लाफायत यांच्या नेतृत्वाखाली सिव्हिल गार्ड्स ची नर्मिती केली.
- राष्ट्रीय सभेने अनेक सुधारणा आखल्या.
- त्या यशस्वी झाल्या.
- राजाने गुप्तपणे राष्ट्रीय सभा नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला.
- तसेच राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना लवकरच अटक होईल अशी अफवा पसरली.
- त्यामुळे पॅरिस मधील लोक संतप्त झाले.
- १४ जुलै १७८९ ला पॅरिस मधील बॅस्टिल तुरुंगावर हल्ला केला.





बॅस्टिलच्या तुरुंगावर हल्ला

- तेथे असलेल्या कैदयांची सुटका केली.
- त्यांनी मोठया प्रमाणात दारुगोळा हस्तगत केला.
- बॅस्टिलचा तुरुंग हा अनियंत्रित राजेशाही, सामाजिक विषमता व अन्यायाचे प्रतीक होता.
- त्यामुळे बॅस्टिलचा पाडाव हे स्वातंत्र्याचे प्रतीक बनले.
- फ्रेंच राज्यक्रांतीच्या वाटचालीतील पहिला रक्तरंजित प्रसंग होता.

# रक्तरंजित क्रांती



- फ्रान्सच्या इतिहासात १४ जुलै हा दिवस राष्ट्रीय दिन म्हणून साजरा केला जातो.



## ❖ राष्ट्रीय सभेचे कार्य –

- या पाडावानंतर सामान्य जनतेत धर्मगुरु, उमराव यांच्या विरोधातील असंतोषात वाढ झाली.
- ४ ऑगस्ट १७८९ ला धर्मगुरु व उमरावांनी परंपरागत अधिकारांचा त्याग केला.
- राष्ट्रीय सभेने वेठबिगाराची पध्दत रद्द केली.
- जुलमी सामंतशाही रद्द झाली.
- ४ ऑगस्ट हा दिवस सामाजिक क्रांती या नावाने फ्रान्समध्ये ओळखला जातो.

## ❖ मानवी हक्काचा जाहीरनामा –

- १२ ऑगस्ट १७८९ रोजी मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित केला.
- या जाहीरनाम्यावर अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा व रुसोच्या विचाराचा प्रभाव होता.
- प्रजेला स्वातंत्र्य, समता व बंधुता यांची हमी दिली.
- मूलभूत हक्क मान्य करण्यात आले.
- या जाहिरनाम्याचे वर्णन फ्रान्समधील जुन्या युगाच्या मृत्यूचा दाखला असे केले जाते.

Universal Declaration of Human Rights



## ❖ मेरि ॲन्टाईट –


- १६व्या लुईचा कारभार अप्रिय  होण्यास त्याची राणी कारणीभूत झाली होती.
- ती चैनी विलासी वृत्तीची होती.
- तिच्यामुळे फ्रान्सच्या तिजोरीत खडखडाट निर्माण झाला.
- तिला तुटीची राणी म्हणून ओळखले जाते.
- तिचे एकूण वर्तन राज्यक्रांती घडण्यास कारणीभूत

## ❖ स्त्रियांचा मोर्चा –

- १६ व्या लुईने राज्यक्रांती दडपण्यास सुरुवात केली. त्यामुळे फ्रान्समधील जनता संतप्त झाली.
- ५ ऑक्टोंबर १७८९ ला पॅरिसमधील हजारो स्त्रियांनी व्हर्सायिच्या राजवाड्यावर मोर्चा काढला.
- या मोर्चात स्त्रियांच्या वेषातील पुरुष सामील झाले होते.
- संतप्त जमावाने राजा, राणी व राजपुत्र यांची मिरवणूक काढली व त्यांना पॅरीसच्या राजवाड्यात नजर कैदेत ठेवले.

## ❖ फ्रान्सची राज्यघटना –

- फ्रान्समध्ये असंतोषाचा भडका उडाला होता.
- त्यामुळे १६ व्या लुईने जनते विरुध्द इतर राजांची मदत घेण्यास सुरुवात केली.
- लुईने आपल्या परिवाराबरोबर वेषांतर करुन देशाबाहेर जाण्याचा प्रयत्न केला.
- देशाबाहेर जात असताना ते पकडले गेले.
- त्यामुळे राजपरिवाराला बंदीवासात ठेवण्यात आले.
- फ्रान्समधे २२ सप्टेंबर १७९२ रोजी प्रजासत्ताक राज्य घोषित केला आणि राजावर देशद्रोहाचा खटला भरविला.
- २१ जानेवारी १७९३ रोजी राजाचा गिलोटिन यंत्रावर शिरच्छेद केला.



फ्रेंच राज्यघटना तयार करताना भरलेला दरबार




फ्रेंच राज्यघटना

- राज्यक्रांतीतील सर्वाधिक रक्तरंजित दहशतवादाच्या पर्वास सुरुवात झाली.
- इ.स. १७९३ ते १७९५ हा रक्तरंजित कालखंड म्हणून ओळखला जातो.
- क्रांतीविरोधी असल्याच्या संशयावरुन हजारो निरपराध लोकांच्या कत्तली रॉबेस्पिअरमुळे घडून आल्या.
- त्याचा ही गिलोटिनवर शिरच्छेद करण्यात आला.
- क्रांतीची सर्व सूत्रे लष्कराकडे गेली.
- त्यातूनच नेपोलियन बोनापार्टचा उदय झाला.
- नेपोलियनने प्रजासत्ताकाचा शेवट करुन आपले राज्य प्रस्थापित केले.
- त्याने१८ मे १८०४ रोजी स्वत: सम्राट म्हणून जाहीर केले.

## ❖ क्रांतीचा परिणाम –

- बुरबॉ घराण्याची अनियंत्रित राजेशाही संपुष्टात आली.
- फ्रान्समध्ये प्रजासत्ताकाची स्थापना झाली.
- घटनात्मक राज्यपध्दतीला प्रारंभ केला.
- नागरिकांना स्वातंत्र्य बहाल केले.
- त्यामुळे नेपोलियनचा उदय झाला.
- जगावर अनेक परिणाम झाले.

**उदा-**

- भारताने आपल्या राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा स्वीकार केला.
- फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता व बंधुता ही बहुमोल तत्त्वे जगाला दिली.

- जनतेच्या सार्वभौमत्वाचे तत्त्व प्रस्थापित केले गेले.
- अनियंत्रित राजेशाही व पारतंत्र्यातील देशाच्या लढयांना ही क्रांती प्रेरणादायी ठरली.
- मानवी इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.
- या क्रांतीमुळे मानवतावादाला व समाजवादाला प्रेरणा मिळाली.
- जगाच्या मानसिकतेत अमूलाग्र बदल झाले.
- फ्रेंच राज्यक्रांती युगप्रवर्तक घटना घडली.

# Assessment

- योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ........रोजी मानवी हक्काचा जाहीरनामा घोषित केला.

(१३ ऑगस्ट १७८९ , १२ ऑगस्ट १७८९, १४ ऑगस्ट १७८९)

२. ४ ऑगस्ट हा दिवस ........ या नावाने फ्रान्समध्ये ओळखला जातो.

(सामाजिक क्रांती, राजकीय क्रांती, आर्थिक क्रांती)

३. फ्रान्सच्या इतिहासात १४ जुलै हा दिवस......... म्हणून साजरा केला जातो.

(राजकीय दिन, सामाजिक दिन, राष्ट्रीय दिन )

# Exercises

- मानवी हक्काचा जाहिरनामा समजून घेवून भारतीयांनी त्यातील कोणत्या गोष्टीचा स्वीकार केला याची माहिती मिळवा.

- फ्रेंच राज्यक्रांतीचा फ्रेंचवर आणि जगावर झालेला परिणाम थोडक्यात लिहा.